**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 09 वाजून 20 मिनिटं**

**दिनांकः 07.10.2023** **वारः शनिवार**

---

ठळक बातम्या

1. आशियाई क्रीडास्पर्धेत भारताची ऐतिहासिक शतकी कामगिरी , कबड्डी मध्ये महिला संघाला तर तिरंदाजीमध्ये ज्योती सुरेखा आणि ओजस देवतळेला सुवर्ण

2. वस्तू आणि सेवा कर परिषदेची आज नवी दिल्लीत 52 वी बैठक

3. देशातून नक्षलवाद लवकरच संपुष्टात येण्याच्या मार्गावर- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा

4. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी सुधारित बस बांधणी मानकांना मान्यता आणि

5. इराणच्या मानवाधिकार कार्यकर्त्या नर्गिस मोहम्मदी यांना यावर्षीचा शांततेसाठीचा नोबेल पुरस्कार जाहीर

आशियाई स्पर्धा

चीनमध्ये हांगचौ इथं सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतानं आतापर्यंतची सर्वाधिक 100 पदकं जिंकत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. यात 25 सुवर्ण, 35 रौप्य आणि 40 कास्य पदकांचा समावेश आहे. आज तिरंदाजी स्पर्धेत पुरुषांच्या कम्पांउड वैयक्तिक प्रकारांत ओजस देवतळे यानं सुवर्ण तर भारताच्याच अभिषेक वर्मानं रजत पदक पटकावलं. तिरंदाजीत ज्योती सुरेखा हिनं सुवर्ण, तर अदिती स्वामी हिनं कास्य पदकाची कमाई केली. आज महिला कबड्डी संघानं देखील सुवर्णपदकावर आपलं नाव कोरलं. काल हॉकीमध्ये भारताच्या पुरुष संघानं जपानचा 5-1 नं पराभव करत सुवर्ण पदक जिंकलं. कुस्तीमध्येही काल भारतानं तीन कास्य पदकं जिंकली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पदक विजेत्या क्रिडापटूंचं ट्विटर संदेशाद्वारे अभिनंदन केलं आहे

जीएसटी बैठक

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली वस्तू आणि सेवा कर अर्थात जीएसटी परिषदेची आज नवी दिल्ली इथं 52 वी बैठक होत आहे. या बैठकीला केंद्रीय अर्थ राज्य मंत्री पंकज चौधरी यांच्यासह सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे अर्थमंत्री आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती अर्थ मंत्रालयाच्या वतीनं देण्यात आली.

उत्तराखंड बैठक

केंद्रीय गृहमंत्री आज उत्तराखंडला भेट देणार आहेत. या एक दिवसीय दौऱ्यात शहा यांच्या अध्यक्षतेखाली टिहरी जिल्ह्यात नरेंद्र नगर इथं केंद्रीय प्रादेशिक परिषदेची 24 वी बैठक पार पडणार आहे. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि उत्तराखंड या राज्यांचे मुख्यमंत्री सहभागी होणार आहेत. त्यानंतर डेहराडून इथं ते 49 व्या अखिल भारतीय पोलीस विज्ञान काँग्रेसमध्ये सहभागी होणार आहेत.

नक्षलवाद

गेल्या काही वर्षात नक्षलवादी कारवाया आणि नक्षलवादयांवर अंकुश ठेवण्यात सरकार यशस्वी झालं असून ही लढाई आता निर्णायक वळणावर आली असल्याचं केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी काल सांगितलं. नक्षलग्रस्त भागातील कारवायांसंदर्भात काल त्यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली इथं बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह नक्षलप्रभावित राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि संबंधित यंत्रणांचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. 2019 पासून नक्षलग्रस्त क्षेत्र कमी होत असून, 2022 आणि 2023 या वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या उपाययोजना आणि यामुळे प्रभावित झालेल्या सर्व राज्यांच्या सहकार्यामुळे नक्षली कारवाया रोखण्यात सरकारला मोठं यश मिळालं आहे. येत्या 2 वर्षात अशा प्रकारच्या विचारसरणीचा अतिरेक पूर्णपणे नष्ट करण्याचा संकल्प आहे, असंही  शहा यांनी सांगितलं.एकीकडे नक्षलवाद्यांचा प्रतिबंध करताना दुसरीकडे गेल्या वर्षभरात नक्षलग्रस्त भागात विविध विकासाच्या योजना परिणामकारकपणे राबवल्यामुळे गडचिरोलीसारख्या भागातील नक्षलवाद पूर्णपणे संपवण्यात राज्य सरकारला यश येईल असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. इंटरनेटच्या माध्यमातून समाज माध्यमांद्वारे शहरी नक्षलवाद फोफावत आहे, त्याला रोखण्यासाठी एक सक्षम यंत्रणा निर्माण करणं गरजेचं आहे असंही मुख्यमंत्री म्हणाले.

बस-गडकरी

बसची बांधणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या मानकांना केंद्रियमंत्री नितीन गडकरी यांनी मान्यता दिली आहे. ही मानकं मूळ उपकरणं उत्पादक आणि बसचा सांगाडा बांधणारे कारागीर या दोघांनाही एकसमान लागू होतील अशी माहिती समाज माध्यामावर प्रसारित करण्यात आलेल्या संदेशांत देण्यात आली आहे. यामुळे भारतातील बसगाड्यांच्या गुणवत्तेत आणखी सुधारणा करण्याचा मार्ग मोकळा होईल असं   गडकरी यांनी सांगितलं.  बस दुर्घटना टाळण्यासाठी भारतात बस बांधणीचा दर्जा वाढवण्याची गरज होती. आपत्कालीन परिस्थितीत प्रवाशांची सुरक्षा सुनिश्चित करण्याला या नव्या यंत्रणेत प्राधान्यक्रम देण्यात आला असल्याचंही गडकरी यांनी सांगितलं.यासंदर्भातील सूचना मागवण्यासाठी रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाकडून या मानकांसाठी तयार करण्यात आलेल्या मसुद्यासंदर्भात अधिसूचना प्रकाशित केली आहे.

आरबीआय

भारतीय रिझर्व्ह बँकेनं विश्वकर्मा योजनेच्या लाभार्थ्यांचा पेमेंट इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट फंड अर्थात PIDF योजनेत समावेश करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. पीआयडीएफ योजनेला आणखी दोन वर्षांच्या कालावधीसाठी म्हणजेच 31 डिसेंबर 2025 पर्यंत मुदतवाढ देण्याचाही प्रस्ताव दिला आहे. रिझर्व्ह बँकेनं काल मुंबईत विविध विकासात्मक आणि नियामक उपाययोजनांची माहिती दिली. या निर्णयामुळे समाजातील तळागाळापर्यंत डिजिटल व्यवहारांना चालना देण्याच्या प्रयत्न यशस्वी होईल अशी अपेक्षा बँकेनं व्यक्त केली.

EU-MIGRANTS

स्थलांतरितांना समानतेचा अधिकार देण्याच्या मुद्यावर काल युरोपिअन संघटनेच्या सदस्यांच्या झालेल्या बैठकीत गदारोळ झाला. गेल्या १० वर्षात हा मुद्दा गंभीर झाला असल्याचं या प्रतिनिधींचं म्हणंणं आहे. ब्रुसेल्सच्या पुढाकारानं काल ही बैठक झाली, मानवाधिकाराचा मुद्दा समोर ठेऊन या स्थलांतरीतांची समान विभागणी करुन सर्व सदस्य देशांनी जबाबदारी घ्यावी असा प्रस्ताव ठेवण्यात आला होता.  जगातील सर्वात मोठा समुदाय असलेल्या युरोपिअन संघात या प्रस्तावाला समर्थन देणाऱ्या सदस्य आणि ही सामायिक जबाबदारी स्पष्टपणे नाकारणारे देश यांच्यात दोन गट

पडले आणि गदारोळ झाला. पोलंड आणि हंगेरी यांनी काल स्पेनमधील ग्रॅनाडा इथं आयोजित शिखर परिषदेत स्थलांतराबद्दल युरोपियन संघाच्या प्रस्तावाला विरोध केला.

नोबेल-शांती

इराणच्या मानवाधिकार कार्यकर्त्या नर्गिस मोहम्मदी यांना यावर्षीचा शांततेसाठीचा नोबेल पुरस्कार जाहीर झाला आहे. महिलांवरील दडपशाहीविरोधात गेल्या अनेक वर्षांपासून त्या लढा देत आहेत. शांततेसाठीचा हा पुरस्कार मिळवणाऱ्या त्या १९ व्या महिला पुरस्कारार्थी आहेत. इराणमधील प्रमुख मानवाधिकार कार्यकर्त्या असलेल्या नर्गिस या सध्या कारागृहात आहेत. आतापर्यंत त्यांना 13 वेळा अटक करण्यात आली असून पाच वेळा दोषी ठरवण्यात आले आहे. विविध खटल्यांमध्ये त्यांना एकंदर 31वर्षांचा तुरुंगवास आणि 154 फटक्यांची शिक्षा देण्यात आली आहे.

रिझर्व बँक धोरण

भारतीय रिझर्व्ह बँकेनं काल द्वैमासिक पतधोरण जाहीर केलं. या धोरणात रेपो दरामध्ये कोणताही बदल न करता तो साडे सहा टक्क्यांवर कायम ठेवण्यात आला आहे. सलग चौथ्यांदा रिझर्व्ह बँकेनं रेपो दरात कोणताही बदल केलेला नाही. मुंबईत झालेल्या द्वैमासिक आढावा बैठकीनंतर गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी काल ही माहिती दिली.

RBI प्रतिक्रिया- पूल-मंजिरी

स्टेट बँकेचे अध्यक्ष दिनेश खारा यांनी रिझर्व्ह बँकेच्या पतधोरणाचं स्वागत केलं आहे. जागतिक पातळीवर अनिश्चिततेतही स्थिर आणि आर्थिक विकासासाठी महत्त्वाच्या उपाययोजना अंमलात आणण्याच्या रिझर्व्ह बँकेच्या धोरणामुळे प्रगतीचा वेग चांगला राहिला आहे, अशी प्रतिक्रिया खारा यांनी व्यक्त केली. भारतीय बँक संघटनेचे अध्यक्ष आणि पंजाब नॅशनल बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ए के गोयल यांनीही रिझर्व्ह बँकेच्या पतधोरणाचं स्वागत केलं आहे.

बाल-लैंगिक

एक्स, युट्युब आणि टेलीग्राम या समाजमाध्यमांनी बाल लैंगिक अत्याचाराशी संबंधित मजकूर त्यांच्या प्लॅटफॉर्मवरुन त्वरीत काढून टाकण्यासंदर्भात इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं या यंत्रणांना नोटीस बजावली आहे. अशा प्रकारचा मजकूर त्वरीत आणि कायमस्वरुपी काढून टाकावा आणि अशी पोस्ट करणाऱ्यांना या प्लॅटफॉर्मवर प्रवेश देणं त्वरीत बंद करावं असं या सूचनांमध्ये नमूद करण्यात आलं आहे. भविष्यात बाल लैंगिक अत्याचाराचा प्रसार रोखण्यासाठी मसुदा प्रसारित करण्यासंदर्भातील अल्गोरिदम आणि कुणी अशा प्रकारची पोस्ट केल्यास त्याची त्वरीत दखल घेण्यासंदर्भातील यंत्रणा सक्रिय कशी करता येईल यावर लक्ष केंद्रित करावं अशा सूचना या समाजमाध्यमातील कंपन्यांना देण्यात आल्या आहेत.

सिक्कीम

सिक्किममध्ये तिस्ता नदीला आलेल्या पुरामुळे उद्भलेल्या परिस्थितीत मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबियांना 4 लाख रुपयांची मदत सिक्किमचे मुख्यमंत्री प्रेम सिंग तमांग यांनी जाहीर केली आहे. तर मदत छावण्यांमध्ये आश्रय घेतलेल्यांना प्रत्येकी 2 हजार रुपयांची तत्काळ मदत जाहीर करण्यात आली आहे. सिक्किममध्ये मदत आणि बचावकार्य वेगानं सुरु असल्याचं तमांग यांनी काल सांगितलं. सर्व विस्थापित कुटुंबांना तातडीनं पुर्वपदावर आणण्यासाठी मदत पथकं सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. काल मुख्यमंत्र्यांनी या भागातील मदत छावण्यांना भेट दिली

आणि बचाव कार्याचा आढावा घेतला. त्यानंतर ते बोलत होते. सैन्यदलातील कर्मचाऱ्यासह 142 जण बेपत्ता असून अकराशे घरांचं मोठं नुकसान झालं आहे. आतापर्यंत चोवीसशे नागरिकांना वाचवण्यात बचाव पथकाला यश आलं असल्याची माहिती राज्य आपत्ती व्यावस्थापन विभागानं दिली आहे.

पाऊस
गुजरातचा उर्वरित भाग, महाराष्ट्राचा काही भाग तसंच वायव्य भारताच्या उर्वरित आणि मध्य भारतातील बहुतांश भागांतून नैऋत्य मोसमी पावसानं माघार घेतली असल्याचं भारतीय हवामान विभागानं म्हटलं आहे.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.